**सत्र खटला क्र. १०/२०२५ मधील फौजदारी जामीन अर्ज**
**मनिषा देवानंद उर्फ नंदकिशोर घुगे**
**वि.**
**महाराष्ट्र शासन**
**(CNR NO. MHBU20-000198-2025)**

## नि.क्र. ५६ खाली आदेश
## (पारीत दिनांक २७ एप्रिल २०२६)

**०१]** अर्जदार – **मनिषा देवानंद उर्फ नंदकिशोर घुगे** हिने भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४८३ अन्वये पोलीस ठाणे, बिबी येथील अपराध क्र. २५२/२०२४, कलम १०३ (१) भारतीय न्याय संहिता खालील प्रकरणात नियमित जामीन मिळण्यासाठी प्रस्तुत अर्ज दाखल केला.

**०२]** अभियोग पक्षाच्या कथेनुसार फिर्यादीची पत्नी आरोपी मनिषा घुगे हीचे मंगेश लादे या दुसऱ्या व्यक्ती सोबत पुणे येथे राहत असतांना प्रेमसबंध होते. त्यामुळे फिर्यादी त्याच्या कुटुंबासह त्याचे मुळ गावी महार चिकना, ता. लोणार येथे राहण्यास आला. फिर्यादी हा नेहमी ट्रकवर कामाला जात असे आणि आरोपी मनिषा घुगे व त्यांचा मुलगा मृतक सुर्यकांत ऊर्फ शिवराज घुगे वय–१५ महीने हे घरी राहत असे. दिनांक २९.११.२०२४ रोजी फिर्यादी हा बाहेरगावी ट्रकवर कामाला गेलेला होता आणि आरोपीची सासू व दिर शेतात कामाला गेलेले होते. आरोपीचा मुलगा हा लहान असल्याने, फिर्यादी हा आरोपीला फारकती देणार नाही, तसेच आरोपीचा मुलगा/मृतक हा तिच्या प्रेमसबंधामध्ये अडसर ठरु नये म्हणून आरोपीने मृतक सुर्यकांत हा झोपेत असतांना, त्याला जिवे ठार मारण्याचे उददेशाने, झोक्यातुन उचलुन घराबाहेर असलेल्या पाण्याच्या टाकीत टाकून दिले. मृतक सुर्यकांत याच्या रडण्याचा आवाज येऊ नये म्हणून आरोपीने वरुन टाक्यावर टोपले/झाकन ठेवून मृतक यास पाण्यात बुडवुन जिवाने ठार मारले. त्यानंतर आरोपीने फिर्यादी व त्याचे नातेवाईकांसमोर गुन्ह्याची कबुली दिली. म्हणून फिर्यादीने पोलीस ठाणे, बिबी येथे फिर्याद दाखल केली.

**०३]** अर्जदाराच्या वतीने विद्वान विधिज्ञ श्री. जी. डी. लांडगे यांनी युक्तिवाद केला

की, फिर्यादीची फिर्याद, साक्षीदार सचिन याचा जबाब आणि इतर साक्षीदारांचे जबाब यामध्ये प्रचंड तफावत आहे. सर्व साक्षीदार घटनेबाबत वेगवेगळ्या ठिकाणी माहिती मिळाली असल्याचे सांगतात. त्यामुळे अभियोग पक्षाची कथा संशयास्पद आहे. फिर्यादी व साक्षीदार हे एकमेकांचे नातेवाईक आहेत. त्यामुळे फिर्यादी व सर्व साक्षीदार यांनी कट रचून आरोपीला खोट्या गुन्ह्यात फसवले आहे. विद्वान विधिज्ञांनी न्यायालयाचे घटनास्थळ पंचनाम्याकडे लक्ष वेधले. घटनास्थळ पंचनाम्यातील नकाशा दाखवून विधिज्ञांनी युक्तिवाद केला की, पाण्याची टाकी / निळा ड्रम हा ओट्याला लागून आहे. त्यामुळे एखादे लहान बाळ ओट्यावरून ड्रम मध्ये पडून त्याचा जिव जाणे स्वाभावीक आहे. आरोपी ही मृतकाची जन्मदाती असल्याने स्वतःच्या मुलाचा जिव घेणे असंभव आहे. याउलट साक्षीदारांच्या बयाणानुसार घटनेबाबत समोर आलेली माहिती ही पुर्णपणे संशयास्पद आहे.

०४] अर्जदार / आरोपी हिच्या वतीने पुढे युक्तिवाद करण्यात आला की, अर्जदार ही महिला असून तिची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही. या प्रकरणातील पूर्ण साक्षीदार तपासून झाले आहे. त्यामुळे आरोपीच्या अधीक कोठडीची आवश्यकता राहिलेली नाही. आरोपी / अर्जदार हिला जामीन दिल्यास ती जामीन आदेशावरील कोणत्याही अटी व शर्तींचे पालन करण्यास तयार आहे. त्यामुळे आरोपी/अर्जदाराला जामीनावर सोडण्याची विनंती करण्यात आली.

०५] याउलट, विद्वान सरकारी वकील कु. आर. डी. बावस्कार यांनी तपासी अंमलदाराच्या म्हणण्यावर जोर देऊन जामीन अर्जावर प्रखर आक्षेप घेतला. त्यांनी युक्तिवाद केला की, प्रकरण अंतीम युक्तिवादासाठी असतांना हा अर्ज दाखल करण्यात आलेला आहे. त्यामुळे अंतीम निकालाच्या वेळेस अर्जदारातर्फे करण्यात आलेला युक्तिवाद विचारात घेऊन न्यायनिर्णय दिल्या जाऊ शकतो. परंतु विलंब करण्याच्या हेतूने हा जाणीवपूर्वक अर्ज दाखल करण्यात आला आहे. परिस्थितीत कोणताही बदल झाला नसल्याने प्रस्तुत अर्ज विचाराधीन घेण्यास अपात्र आहे. अशा परिस्थितीत अर्जदाराला जामीन मिळाल्यास ती साक्षीदारांवर दबाव आणू शकते किंवा ती फरार देखील होऊ शकते. म्हणून अर्जदाराचा जामीन अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आली.

०६] वरील युक्तिवादाच्या अनुषंगाने दोषारोपपत्रातील कागदपत्रांची पाहणी केली असता असे दिसून येते की, या प्रकरणात न्यायालयाने सर्व साक्षीदारांची बयाणे नोंदवून प्रकरण अंतीम युक्तिवादासाठी ठेवले असतांना अर्जदाराने दुसरा जामीन अर्ज दाखल केला आहे. दुसरा जामीन अर्ज दाखल करण्यासाठी परिस्थितीत कोणता बदल झाला यावर युक्तिवाद करण्यात आलेला नाही. सरकारी विधिज्ञ अंतीम युक्तिवादासाठी तयार आहे. याउलट, बचाव पक्षाचे वकील यांनी केलेला युक्तिवाद अंतीम निकालाच्या वेळेस विचाराधीन घेता येतो. त्यामुळे नवीन अर्ज विचाराधीन घेण्यास परिस्थितीत कोणताही बदल झालेला नाही.

०७] याशिवाय, या प्रकरणातील गुन्ह्यात मृत्यू दंडाच्या शिक्षेची तरतूद आहे. आरोपी व साक्षीदार हे एकमेकांचे नातेवाईक आहेत. त्यामुळे गुन्ह्याचे स्वरूप पाहता आरोपीला जामीन मिळाल्यास ती फरार होण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. म्हणून गुन्ह्याचे स्वरूप, गुन्ह्यासाठी असलेली शिक्षेची तरतूद व आरोपी कृत्य पाहता आरोपीचा जामीन अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे.

करिता पुढील आदेश पारित करण्यात येतो.

**– आ दे श –**

जामीन अर्ज (नि.क्र. ५६) नामंजूर करण्यात येतो.

(आदेश खुल्या न्यायालयात लिखित व घोषित)

SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR
Digitally signed by SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR
Date: 2026.04.27 17:51:07 +0530

**(सागर कृ मुंगीलवार)**
**अतिरिक्त सत्र न्यायाधीश**
**मेहकर**

**दिनांक – २७.०४.२०२६**
**ठिकाण – मेहकर**

मी, खात्रीपूर्वक असे कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेशाचा/न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ आदेशाप्रमाणे /न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

न्यायालयाचे नांव – श्री. सागर कृ मुंगीलवार,
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, मेहकर.

लघुलेखकाचे नांव – शेख इम्रान अब्दुल रऊफ,
लघुलेखक ग्रेड – १, मेहकर

दिनांक – २७.०४.२०२६